## प्रेसनोट

# " महाराष्ट्र पोलीस यांचा रेझींग डे निमीत्त रुट मार्च "

जा.क्र. १४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०१/२०१८

भंडारा:— दिंनाक ०६/०१/२०१७ रोजी महाराष्ट्र पोलीस "रेझींग डे" या निमीत्ताने भंडारा पोलीस दलातर्फे पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदान येथे मा. विनीता साहू, यांच्या अध्यक्षतेखाली मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांच्या उपस्थितीत "पोलीस रेझींग डे" कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी १) जेसीस कॉन्वेट २) संत शिवराम ३) अर्जुन ॲकडमी ४) गणेश हायस्कुल ५) नुतन महारष्ट्र ६) भागीरथ भाष्कर हायस्कुल भंडारा ७) लाल बहादुर शास्त्री भंडारा ८) सेंट पॉल हायस्कुल ९) गांधी विद्यालय भंडारा १०) जिजामाता हायस्कुल भंडारा ११) निशा विद्यालय भंडारा १२) नंदलाल पाटील विद्यालय साकोली १२ शाळेतील मुले व मुलींचा सहभाग होता.

कार्यक्रमाला मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू, यांनी पोलीसांची प्रतिमा कशी असावी, सोशल मिडीया अवरनेस, वाहतुक सुरक्षा जनजागृती, महिला सक्षमीकरण, राष्ट्रीय एकात्मता याबाबत माहिती दिली, तुम्ही कोण आहात? पोलीस तुमच्या मदतीला आहे. तुम्हाला कोणीही त्रास देत असले तर तुम्ही आपले शिक्षक आपल्या पाल्यांना, मोठे भाऊ, बहीणाला सांगीतले पाहीजे, मोठया व्यक्तींना, पोलीसांना सांगीतले पाहीजे. आपल्यापैकी कोणीतरी चांगला माणुस असेल आपल्यामध्ये वेगवेगळी क्वॉलीटी असणार ती तुम्ही पुढे नेली पाहीजे. जसे तुम्हाला खेळ, किंवा इतर क्षेत्रात कोणत्याही ईच्छा असेल ते पुढे नेवुन तुम्ही चांगली कामगिरी केली पाहीजे, असे उदाहरण दिले. तुमच्या पैकी किती मुले मोबाईल वापरतात. मोबाईवर व्हाट्सॲप, फेसबुक इं. माहिती सर्वांना असल्याने त्यांचा चांगल्या कामासाठी उपयोग केला पाहीजे.

महाराष्ट्र शासनाने, २ जानेवारी. हा दिवस महाराष्ट्र पोलीस दलाचा " रेझींग डे" दिवस म्हणुन मान्यता दिली आहे. यानिमीत्त भंडारा पोलीस दलातर्फे विवीध कार्यक्रम भंडारा जिल्हा पोलीस उप— विभागा अंतर्गत पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी आपआपल्या पो. स्टे. स्तरावर वेगवेगळे शाळा, कॉलेज, मध्ये कार्यक्रम घेण्यात आले. सदर कार्यक्रमा दरम्यान पोलीस व शाळकरी मुले, मुलींनी मिळुन तसेच पोलीस बॅन्ड पथकासह भंडारा शहारातील विवीध भागात पथ संचालन केले.

यावेळी भंडारा जिल्ह्याचे पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी नागरे, पोनी.सिडाम पो. स्टे. भंडारा, पोनी. घुसर स्थागुशा भंडारा, पोनी. तेलुरे जिवीशा भंडारा, सपोनी हत्तीमारे, सपोनी. कदम मानवी संसाधन सपोनी. काळे राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, एकुण ७०० विदयार्थी तसेच पोलीस अधिकारी तसेच पोलीस कर्मचारी हजर होते. सदर संचलनाचा मार्ग पोलीस मुख्यालय ते पोस्ट ऑफीस चौक ते मुस्लीम लायब्ररी चौक ते त्रिमुर्ती चौक ते पोलीस मुख्यालय कवायत मैदान असा होता, सदर वेळी नंदलाल पाटील कापगते विद्यालय साकोली यांनी वाहतुक नियमाबांबत पथनाटय सादर केले. तसेच पोलीसांनी विवीध शस्त्रे व रायफली बद्दल माहिती देवुन कवायत मैदानात संचालनाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन, आभार प्रदर्शन पोउपनि. आडोळे दोषसिध्दी विभाग भंडारा यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.